# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रं.१९६७, मुंबई ४००००१

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail :desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http://www.dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/न्यायालयीन प्रकरण**

क्र.२अ/एडीएम /जात वैधता/ २०१८/ ९५८२

दि. 14 DEC 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद

विषय : शै.वर्ष २०१८-१९ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्राअभावी प्रवेश रद्द केलेल्या उमेदवारांबाबत माहिती.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्राऐवजी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची पावती सादर करुन केंद्रीभूत प्रवेश प्रकियेमार्फत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना प्रवेश नियत्रंण प्राधिकरणाने निश्चित केलेल्या कालावधीत दिनांक ३०/८/२०१८ पर्यत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे होते. तथापि विहीत मुदतीत सदर प्रमाणपत्र सादर करु न शकल्याने संस्थानी प्रवेश रद्द केलेल्या शाखानिहाय उमेदवारांची संख्या तसेच विहित मुदतीनंतर संबंधित उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले असल्यास अशा उमेदवारांची संख्या मा.उच्च न्यायालयास सादर करावयाची आहे.

तसेच आज रोजी संस्थेमध्ये थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात रिक्त जागांची माहिती सुदधा सादर करावयाची आहे. सदर माहिती मा.उच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने माहिती दि.१५/१२/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत ईमेल व्दारे(:desk2a@ dtemaharashtra.gov.in ) पाठविण्यात यावी.

(डॉ.राजीव शेटकर)

उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

पृष्ठांकन क्रः-विकाअ/शिक्षण/२०१८/ 2983

सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.

दिनांक 15/12/18

सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

**प्रत :-**

१)प्राचार्य, सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था.अमरावती विभाग अमरावती यांनी वरिल प्रमाणे माहिती आज दिनाक १५/१२/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यत सादर करावी

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.